**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दि.०५/०५/२०२६**

## जनगणना प्रशिक्षणाचे दुसरे सत्र संपन्न;

## प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

जनगणना २०२७ अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेत स्वगणना प्रक्रियेस सुरुवात झाली असून दि.०१ मे ते १५ मे २०२६ पर्यंत स्वगणना प्रकिया राबविण्यात येणार आहे. यानंतर दि.१६ मे पासून घरगणनेला सुरुवात होणार असून या कामी नियुक्त करण्यात आलेल्या क्षेत्रीय प्रशिक्षकांमार्फत प्रगणक, पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देणे कामी महानगरपालिका प्रभाग समिती निहाय दि.२७ एप्रिल ते दि.०८ मे, २०२६ पर्यंत तीन सत्रांमध्ये प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २७ ते २९ एप्रिल या कालावधीत पहिले सत्र, दिनांक २ ते ५ मे या कालावधीत प्रशिक्षणाचे दुसरे सत्र पूर्ण झाले असून दि.०६ मे ०८ मे पर्यंत प्रशिक्षणाचे तिसरे सत्र घेण्यात येणार आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेतील नऊ प्रभाग समित्यांअंतर्गत नियुक्त शाळा/महाविद्यालयांमध्ये हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. जनगणनेच्या कामासाठी वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ०१ मास्टर ट्रेनर, ९१ क्षेत्रीय प्रशिक्षक (Field Trainers), ७१७ पर्यवेक्षक व ४२९८ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जनगणना २०२७ ही देशातील पहिलीच डिजिटल जनगणना असल्यामुळे संबंधित पर्यवेक्षक व प्रगणकांना योग्य व अचूक प्रशिक्षण देण्यात येत असून प्रशिक्षणादरम्यान विशेष मोबाईल ॲपचा वापर, प्रश्नावलीचे सुलभीकरण आणि डेटाची सुरक्षा या तांत्रिक बाबींसोबतच नियुक्त केलेल्या पर्यवेक्षक आणि प्रगणक यांना ॲपच्या माध्यमातून  जनगणना कामकाजाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

या जनगणना प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या कर्मचाऱ्यांना विभागामार्फत नोटीसा देण्यात आल्या असून, त्यांचेवर विभागामार्फत कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे.

जनगणना २०२७ अंतर्गत दि.१ ते १५ मे, २०२६ या कालावधीत नागरिकांना स्वगणना ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेतील नागरिकांनी https://se.census.gov.in या पोर्टलवर माहिती भरून स्वगणना करावी, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.